## विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ १७७ /२०२४      दि.१७ /०९/२०२४

### –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** विठ्ठलवाडी वाहतूक उप विभागाचे हद्दीत दि. ०७/०९/२०२४ ते दि. १७/०९/२०२४ या कालावधीत सार्वजनिक **'गणेशोत्सव'** साजरा होणार आहे. दि. १७/०९/२०२४ रोजी **उल्हासनगर फ्रेंडस् सर्कल मंडळाचे** गणपती विसर्जन करीता मिरवणूक काढण्यात येणार आहे. सदर मिरवणूक श्रीराम चौक, उल्हासनगर ४ येथे समाप्त होणार आहे. या कालावधीत नमूद विसर्जन व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी, मी, पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये यापुर्वी जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/१७५/२०२४, दि. १४/०९/२०२४ रोजी वाहतूक नियंत्रण अधिसूचना निर्गमित करण्यात आलेली होती. सदर अधिसूचना रद्द करून नवीन सुधारित अधिसूचना मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून खालीलप्रमाणे वाहतूक नियंत्रण अधिसूचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद –** १) व्हिनस चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **व्हिनस चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने व्हिनस चौक कडून डावीकडे वळून माणेरेगाव व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** २) श्रीराम चौक कडून मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **शासकीय हॉस्पिटल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने उल्हासनगर रेल्वे स्टेशन मार्गे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद –** ३) श्रीराम चौक कडून ओ.टी. सेक्शन मेन मार्केट कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **श्रीराम चौक पेट्रोल पंप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** सदर वाहने श्रीराम चौक पेट्रोल पंप येथून व्हि.टी.सी. रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना दि. १७/०९/२०२४ रोजी सायंकाळी १५:०० ते रात्रौ २४:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( पंकज शिरसाट )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण,
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी
पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३ व ४ व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :— पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/— सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :— समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/— सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत कार्यवाहीसाठी** :—
सपोआ उल्हासनगर वाहतूक विभाग व कल्याण, पोनि. उल्हासनगर, विठ्ठलवाडी, कल्याण वाहतूक उपविभाग, ठाणे शहर
२/— उल्हासनगर म.न.पा. संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.